Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH
JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III / Hindi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned by CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १६ | आहार हिच आरोग्याची गुरुकिल्ली - एक अध्ययन<br>**प्रा. कविता आर. किर्दक** | ६६-६७ |
| १७ | आधूनिक जीवनशैलीचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम<br>**प्रा. मोनाली मो. सलामे** | ६८-७१ |
| १८ | संस्कृत भाषा व संस्कृत साहित्यातील शैक्षणिक मूल्ये<br>**सौ. संगीता गजानन वायचाळ** | ७२-७७ |
| १९ | स्त्रीवादी समीक्षा<br>**प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे** | ७८-८१ |
| २० | पोषण आणि आरोग्य यांचा सहसंबंध - एक अभ्यास<br>**प्रा. वैशाली कांबळे (जिवने)** | ८२-८६ |
| २१ | पश्चिम विदर्भातील भूपृष्ठाच्या उंचसखलपणाचा पिकांच्या विविधतेवर होणारा परिणाम<br>**प्रा. डॉ. कल्पना देशमुख** | ८७-९१ |
| २२ | कवितेची रुपबंधात्मक मीमांसा<br>**प्रा. डॉ. सौ. वीरा पवन मांडवकर** | ९२-९७ |
| २३ | क्रांतिकारक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज<br>**प्रा. डॉ. रमेश संभाजी खंडारे** | ९८-१०१ |
| २४ | कृषीचा इतिहास<br>**डॉ. प्रदिप वि. ताकतोडे** | १०२-१०५ |
| २५ | मराठी भाषिक कौशल्ये आणि व्यक्मिमत्व विकास<br>**डॉ. ममता दयने** | १०६-११० |
| २६ | मानवी जीवनात आहाराचे महत्व<br>**प्रा. डॉ. उषा नानाजी राखुंडे** | १११-११६ |
| २७ | लोकहसाहित्यातील बंजारा लोकगीतांचे शैक्षणिक मूल्ये<br>**मनोज उकंडराव चव्हाण** | ११७-१२१ |
| २८ | भविष्यकालीन सुदृढआयुष्यमानासाठी समतोल आहाराची भूमिका - एक चिकीत्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. वैशाली मेश्राम** | १२२-१२७ |
| २९ | संत तुकाराम यांच्या अभंगातील विश्वात्मकता<br>**नरेश कृ. महाजन** | १२८-१२८ |
| ३० | नव्या युगातील ग्राहकांची वर्तणूक<br>**प्रा. डॉ. अरुण एन. दसोडे** | १२९-१३२ |


Scanned by CamScanner

# २२. कवितेची रुपबंधात्मक मीमांसा

**प्रा. डॉ. सौ. वीरा पवन मांडवकर**
सहाय्यक प्राध्यापक, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ.

**प्रस्तावना**

मानवी समाजाच्या आणि संस्कृतीच्या इतिहासात 'कविता' अथवा 'काव्य' ह्या वाङ्मयप्रकाराचे स्थान मूलभूत आणि मध्यवर्ती राहिलेले आहे. म्हणूनच भारतीय आणि पाश्चात्य ह्या दोन्ही परंपरांमध्ये 'काव्य' ह्या आकृतीबंधाचे प्राचीनांपासून अर्वाचीनांपर्यत अनेकानेक मीमांसकांनी विविधांगी स्वरूपाचे चिंतन मांडलेले दिसते. विशेषत: भारताला जवळजवळ पाच हजार वर्षांची महाकाव्यनिर्मितीची समृद्ध परंपरा लाभल्याने काव्यमीमांसेला किंवा काव्यशास्त्रालाही अशीच दीर्घ परंपरा लाभलेली आहे. आधुनिक काळात काव्याच्या सर्वांगीण मीमांसेला विशेष गती मिळाली. एक मूलभूत वाङ्मयप्रकार म्हणून जगातील सर्वच भाषांतून एकाचवेळी काव्यरूपाची सर्वस्पर्शी मीमांसा होत गेली. परस्परानुबंध निर्माण झाल्याने इतरांप्रमाणेच मराठीलाही अद्ययावत आणि विकसित अशी काव्यविषयक चिंतनदृष्टी लाभत गेली. कलेच्या आणि वाङमयाच्या क्षेत्रात 'काव्य'ह्या आकृतीबंधाचे मूलगामी चिंतन प्राचीन मध्ययुगीन अर्वाचीन असे अखंडपणे होत राहिले.

**बीजशब्द :** रूपबंध, मीमांसा, परंपरा, अभिव्यक्ती, आस्वाद, मुद्रण, उच्चार, परिवर्तन, घटक, व्याख्या

**विषय विवेचन**

मराठी भाषेत एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात काव्याच्या स्वरूपाची आणि घटकांची बहुपेडी चर्चा ग्रंथरूपात आणि फुटकळ लेखरूपात उदंड झाली आहे. 'काव्य' ह्या आकृतीबंधाचा उगम, त्याचा विविध वाटावळणांनी झालेला प्रवास, परंपरेच्या ओघात जन्मास आलेले आणि कालौघात लुप्त झालेले विविध काव्यप्रकार, आधुनिक काळात बहरलेली स्फुट भावकविता, तिची आशयानुसारी विभिन्न प्रस्फुटणे, काव्यमीमांसेच्या व समीक्षेच्या विविध पद्धती आणि जडणघडणीचा शोध, तिचा मराठीतील आजवरचा इतिहास त्या इतिहासातील वाटावळणे व परिवर्तने, 'कविता' ह्या रूपबंधाचे घटक, त्या घटकांचे आंतरसंबंध, त्याच्यातली एकात्मता, आशय अभिव्यक्तीच्या अंगाने करण्यात आलेली काव्याची वर्गीकरणे व प्रकार आणि त्या प्रकारांच्या पृथगात्म वैशिष्ट्यांचा शोध आणि मांडणी, काव्याच्या विविध व्याख्या, त्या व्याख्यांच्या मर्यादा आणि तिच्यातील अडचणी, काव्यातील शब्द, प्रतिमा, प्रतिके ह्यांचे स्थान व महत्त्व इत्यादी अंगांनी मराठीत काव्यरूपाची मीमांसा करण्याचा प्रयत्न झालेला आहे.

चित्रकला दृश्यरूप असते. शिल्पकला साक्षात दिसते आणि स्पर्शिताही येते. कविता ही आस्वादरूप असते. कविता वाचावी लागते किंवा ऐकावी लागते. त्याशिवाय त्याचे सौंदर्य लक्षात येत नाही. कवितेचे लिखित किंवा मुद्रित रूप हे उच्चाररूप सुरक्षित ठेवण्याचा उपाय आहे. हस्तलिखित किंवा मुद्रित साहित्य नष्ट केले तरी कविता नष्ट होत नाही. पण चित्र, शिल्प, स्थापत्य नष्ट झाले की त्याची पुन:निर्मिती करणे फार



Scanned by CamScanner

कठीण आहे. कविता कोणत्याही स्वरूपात असली तरी तिचे स्वरूप सारखे असते. ती कागदावर, भिंतीवर, पुस्तकात कुठेही लिहिल्या गेली असली तरी तिचे सौंदर्य कायम राहते. ती पटकन कुठेही घेऊन जाता येते. कोणालाही देता येते. कुठेही मागवता येते. तिच्यात मुद्रणदोष, शुद्धलेखनदोष असले तरी ते दुरुस्त करून घेता येऊ शकतात. त्याच्याने कवितेच्या सौंदर्याला विशेष हानी होत नाही. म्हणून कवितेचे मौखिक स्वरूप हे महत्त्वाचे मानण्यात येते.

**कवितेत शब्दांचे महत्व**

कविता भाषेतून व्यक्त होते. भाषा ध्वनीरूप आहे. लिपी म्हणजे ध्वनींचे केवळ संकेत. कविता वाचली तरी मनात शब्दांचे उच्चार सहज होतात. कवितेचे नादसंगीतसौंदर्य, वर्णमैत्रीची श्रवणसुखदता इत्यादी गोष्टी उच्चारावरच अवलंबून असतात. अनुप्रास, यमकांसारखे शब्दालंकार आणि विविध छंदप्रकार ध्वनींच्या उच्चारावर, नियमनावर आधारलेले आहे. गीत काव्यात नादमाधुर्याची प्रतीती विशेषत्वाने येते. काव्यातील नादसौंदर्य हे शब्दोच्चारावर अवलंबून असते. त्यामुळे खरेतर कवितेचा अनुवाद होऊ शकत नाही. काही साहित्यिकांच्या मते जी अनुवादातीत असते, तीच खरी कविता.

'ऐलतटावर पैलतटावर , हिरवाळी लेवून,
निळासावळा झरा वाहतो, बेटाबेटांतून'

या ओळींचे भाषांतर करायला गेले तर खरेच ते कसे होईल आणि त्याचे सौंदर्य कुठल्याकुठे नाहीसे होऊन जाईल, याची आपण कल्पना करू शकतो. यावरून हे लक्षात येते की कविता ही संगीतमय वाणी आहे. तिच्यात शब्दांचे त्यांच्या उच्चारांचे खूप महत्त्व आहे. छंद लयीच्या अनुसरणातून तिच्यात मेलडीचे रूप येत असते.

कवितेच्या उच्चारणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी तिची तुलना मंत्रांशी केली जाते. मंत्र उच्चारताना ज्याप्रमाणे त्याच्या उच्चारणावर त्याचे फळ अवलंबून असते. मंत्रांचे मंत्रत्व मंत्रवाहक शब्दांच्या अर्थामध्ये नसते तर त्यांच्या विशिष्ट ध्वनिसंयोजनात असते. बरेचदा मंत्रांतील शब्दांना अर्थ नसतो. हेच सिद्ध करण्यासाठी 'वाचा' या लघुनियतकालिकात एकदा साप उतरविण्याचे, वशीकरणाचे मंत्र छापण्यात आले होते. म्हणून काही या कलांमध्ये सगळेच वाचक पारंगत झाले नाही. त्यासाठी त्याच्या योग्य उच्चारण्याच्या साह्याने त्यात नैपुण्य आणता येते. त्याचप्रमाणे काव्याच्या उच्चाररूपाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते.

काव्याच्या सौंदर्य वर्धनात उच्चारणाचे महत्त्वाचे स्थान असले तरीही कविता तेवढ्यावरच अवलंबून नसते. कवितेचे वाचन किंवा गायन करता आले म्हणजे कविता यशस्वी झाली असे नाही. काही कवितांच्या अर्थामध्येच इतके सौंदर्य लपलेले असते की त्यांनी कविता म्हटल्या नाही किंवा वाचकांनी त्याचा कोणत्याही स्वरूपात आस्वाद घेतला तरीही त्याचे सौंदर्य अबाधित राहते. संमेलनात म्हटली जाणारी कविता रसिकांकडून जितकी वाखाणल्या जाते तितकीच अर्थसौंदर्याने नटलेली कविताही वाखाणल्या जाते. किंबहुना अर्थसौंदर्याने परिपूर्ण कविता रसिकांपर्यंत कधीही कोणत्याही स्वरूपात पोचू शकते. तिला संमेलनीय वाचनाच्या अधीन रहावे लागत नाही. त्यामुळे रसिककेंद्री न होता कवीकेंद्री होते. तिला वाचकांच्या 'वाहवा'ची चिंता वाटत नाही.



Scanned by CamScanner

तसेच कविता वाचणाऱ्यावर कविता रसिकांपर्यंत पोचविण्याची जबाबदारी असते. एकच कविता वाचकागणिक वेगळ्या दर्जाची होण्याचा धोका असतो. कोणत्या काव्यवाचकाला कवितेतली कोणती ओळ महत्त्वाची वाटेल ते काही सांगता येत नाही. कवितेच्या वाचनात म्हणूनच वाचकागणिक आणि कालगणिक फरक पडण्याचा संभव असतो.

**कवितेचे लिखित व मुद्रित रूप**

प्राचीन काळात जेव्हा मुद्रणकलेचा शोध लागला नव्हता, तेव्हा विविध संप्रदायातील संतकवींद्वारे काव्यवाचन किंवा गायन होऊन कविता रसिकांपर्यंत पोचत होती. आज आधुनिक काळात मात्र मुद्रणाच्या शोधामुळे कविता रसिकांसमोर प्रामुख्याने मुद्रित स्वरूपात येते. आता कवी उच्चारणाचे प्रयोग करण्यापेक्षा कविता लेखनात प्रयोग करण्याचा प्रयत्न करतो आहे. कवितेला चित्रकलेची परिमाणे देऊन काही साधता येते का, हे पाहण्यात येत आहे. मराठीत श्री.कृ. जोशी यांनी याबाबतीत काही प्रयोग केले आहेत. लिपीचिन्हांचा अनुभवाशी समन्वय साधण्याचा हा प्रयत्न आहे. उदा. कवी विं.दा. करंदीकर यांच्या काही ओळींत हा प्रयोग केला आहे.

पिंपळ घेऊन भार शिरावर
उभा राहतो
ए
क
प
दा
व
र

या ओळी वाचतानाही एका पायावर उभ्या असलेल्या पिंपळाची आकृती आपल्या समोर चित्ररूपाने उभी रहाते. अशा अर्थाच्या आकारानुरूप कविता लेखन करणाऱ्या कलेला श्री. रा.अ. काळेले 'अनुलेखन' नावाचा नवा अलंकार मानतात. त्याचप्रमाणे लहानमोठे, उलटसुलट टाइप करून, विरामचिन्हे वापरून काही कविता लिहिल्या जातात. या प्रकाराला 'काँक्रीट पोएट्री' म्हणूनही ओळखले जाते. पण सर्वच कविता अशा स्वरूपात लिहिल्या जाऊ शकत नाही. कवितेची चित्रात्मकता तिच्या आशयाचे अविभाज्य अंग होत असेल तसेच त्यातून भावार्थाची नवीन वलये निर्माण होत असतील तर या प्रकाराला केवळ चित्रालंकार समजणे योग्य होणार नाही. बोरकरांच्या कवितेत सचेतन निसर्गचिन्हे, पशु—पक्ष्यांचा सजीव निसर्ग आणि मानव यांची चित्रमालिकेत सरमिसळ होते. तसे वर्गीकरण कवितेच्या रचनेत नाही. 'निसर्गाच्या स्वच्छंद, निर्मळ, आनंदी वातावरणाला साजेसे एवढेच मानवीरूपाचे चित्र बालकवी रेखाटतात. उलट बोरकर निसर्गाच्या अवस्थांचे मानवीकरण करतात. झाडातून येणारे वारे हे त्यांना झाडांचे श्वास वाटतात, तर गंधित वारा हा अत्तर लावून फिरणारा मानव वाटतो. नदी ही नवोडा म्हणून त्यांना जाणवते, तर गर्द हिरव्या वनराईत त्यांना वनदेवीचा हात



Scanned by CamScanner

दिसतो.'[१] या चित्रात्मकतेच्या वैशिष्ट्यामुळे कविता एका जागी बसलेल्या वाचकाला मानसिकरित्या वनराईत फिरवून आणू शकते.

मुदण कलेमुळे कविता दीर्घकाळपर्यंत सुरक्षित राहत असली तरी मुद्रणामुळे कवितेची बरीच हानी होते असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. मुद्रणामुळे कवितेला दृकसंवेदनरूप प्राप्त होत असले तरीही त्यातील संगीतत्वाची बरीच हानी होते. प्रा. बुचर म्हणतात, 'मुद्रणकलेने आपली वाङ्मयीन संवेदना बरीच बोथट केली आहे. शब्दगुण दुहेरी असतो. एक त्याच्या अर्थामध्ये व दुसरा त्याच्या नादामध्ये. कानांचे कार्यही जर डोळ्यांनीच करावे लागले तर आपण मोठ्याच आकर्षणाला मुकतो.' प्रा. बुचर यांचे म्हणणे काही प्रमाणात बरोबर असले तरी कवितेचे स्वरूप कसे असावे याचा विचार करताना अशा अनेक पातळ्यांवर विचार केला गेला आहे. याचे कारण कविता सर्वच प्रकारे प्रभावीपणे व्यक्त केली जाऊ शकते. ती हस्तलिखित स्वरूपातही आकर्षक असते. कारण ती लिहिणाऱ्याचे हस्ताक्षर त्यात असते. ज्यातून कवीच्या चरित्रावर काहिसा प्रकाश टाकला जाऊ शकतो. ती मंचवाचनाने रसिकांपर्यंत पोचू शकते, ज्यामुळे वाचणाऱ्याच्या भावनांची त्यात भर पडून ती अधिक संवेदनशील होऊ शकते. ती गीतस्वरूपात स्वरबद्ध करून गायली जाऊ शकते, ज्यातून कवितेचे शब्दसौंदर्य अजूनच खुलते आणि रसिकांच्या मनात सुरांद्वारे ती दीर्घकाळपर्यंत दरवळत राहते. मुद्रित स्वरूपातील कविताही त्याच्या अर्थसौंदर्याने प्रभाव टाकू शकते. तसेच चित्रात्मकतेचे प्रयोग कवितेत व्हायला लागल्यापासून मुद्रित स्वरूपातील कविताही प्रेक्षणीय होऊ लागली आहे.

**कवितेचे आस्वादन**

कवितेचे आस्वादन हे एका सहृदयातूनच होत असते. कवीची कविता प्रसविण्याची प्रक्रिया पूर्ण झाली, की कवी आपल्याच कवितेकडे एका रसिकाच्या दृष्टीने पाहू लागतो. तो कविता पुन:पुन्हा वाचून त्याचा आस्वाद घेऊ लागतो. त्या क्षणापासूनच कवितेची आस्वादन प्रक्रिया चालू होऊन जाते. जोपर्यंत एखादी कविता रसिकांच्या मनापर्यंत पोचून आस्वादित होत नाही, तोपर्यंत ती कविता निर्जीव आहे असेच म्हणावयास हवे. कवितेचा आस्वाद हा व्यक्तीपरत्वे बदलू शकतो. यात शिक्षण, लिंग, सामाजिक पार्श्वभूमी, वैचारिक क्षमता, वय, मन:स्थिती, पूर्वग्रह याही गोष्टी कवितेच्या आस्वादावर प्रभाव टाकू शकतात. इतकेच नव्हे तर काळही काव्यास्वादावर प्रभाव टाकू शकतो. जसे एखाद्या व्यक्तीने आज कविता आस्वादली. त्याला आवडली. पण काही दिवसांनी किंवा वर्षांनी तीच कविता त्याच व्यक्तीला आवडेलच असे नाही, किंवा आज नाही आवडली, म्हणून कालांतरानेही नाहीच आवडणार, असे नाही. म्हणजेच कविता हा असा कलाप्रकार आहे, जो निर्मितीनंतरही रसिकांच्या मनात पुन:निर्मित होत रहातो. आणि त्याची आस्वादन प्रक्रियाही निरंतर चालू रहाते. तरीही हे वेगवेगळ्या प्रकारचे अर्थ एकाच कवितेच्या आस्वादक्षेत्रात येतात. 'बालकवींच्या 'औदुंबर' कवितेचे मराठी रसिक समीक्षकांनी अनेक अर्थ लावलेले आहेत. पण ते सर्व अर्थ वेगळेपणाने अथवा एकत्रित घेऊनही जे काही होईल त्यापलीकडे 'औदुंबर' नेहमीच पाय सोडून बसलेला असणार.'[२]



Scanned by CamScanner

**कवितेची मूळ प्रवृत्ती**

कवितेच्या वाङ्मयीन रूपाचा विचार निरनिराळ्या पद्धतींनी करता येणे शक्य आहे. स्तोत्रे, पदे अशा स्फुट रचनांपासून महाकाव्यापर्यंत विशाल आणि गुंतागुंतीच्या आकारापर्यंत कवितेची असंख्य रूपे प्राचीन काळापासून प्रचलित आहेत. तरी त्यात मुख्यत्वे गीत, भावकविता, कथाकाव्य, नाट्यकाव्य, आणि विचारानुभव व्यक्त करणारी कविता अशी पाच गटांत विभागणी करता येऊ शकते. प्राचीन युग हे प्राधान्याने धर्मश्रद्धा, संस्कृतीविचार आणि तत्त्वज्ञान या प्रेरणांनी भारलेले असल्यामुळे मानसिकदृष्ट्या कवितेला जवळचे होते म्हणून पद्य हे त्या युगाच्या आविष्काराचे एक स्वाभाविक माध्यम होते. आधुनिक युगाच्या भौतिक आणि शास्त्रीय प्रेरणांना गद्य हे अनुरूप माध्यम वाटणे हेही तितकेच स्वाभाविक होते. याचा परिणाम म्हणजे पद्याच्या क्षेत्रातील अनेक सर्जनशील रूपेदेखील गद्याने आपल्याकडे ओढून घेतली. जसे महाकाव्याचे कादंबरीत रूपांतर झाले. आख्यानाचे नाट्यात रूपांतर झाले. या आक्रमणातही कवितेची काही रूपे सुरक्षित राहिली. या संक्रमणात सुरक्षित राहिलेली कवितेची कोणती रूपे आहेत हे पाहायला गेले तर ती गीत आणि भावकविता हीच दोन आहेत. गद्याचे आक्रमण या कविताप्रकारांवर होऊ शकले नाही. यावरून एक निष्कर्ष काढता येतो की गद्याच्या आक्रमणात गीत आणि भावकविता टिकली कारण तिची मूलभूत रचना कथात्मक किंवा नाट्यात्मक नाही. ती या गद्यप्रकारांपेक्षा वेगळी आहे. तसेच तिला कायमस्वरूपी टिकायचे असेल तर रूपांतरीत किंवा निष्प्रभ न होऊ शकलेल्या रूपांतच कवितेची मूळ प्रवृत्ती तिचे रूप असायला पाहिजे.

भावकवितेचे 'प्युअर पोएटिक एनर्जी' असे वर्णन करण्यात येते. ही 'प्युअर एनर्जी' भावकवितेच्या उत्स्फूर्ततेत, उत्कटतेत आणि भावतल्लीनतेत सामावलेली असल्याचे आढळून येईल. भावकवितेची अंतर्गत संघटना साधणारे सगळे घटक मूलतःच परस्परांशी त्याच्या अंगभूत गुणवैशिष्ट्यांनी निगडित असलेले दिसून येतात. भावकवितेच्या स्फुट आकाराचे नाते तिच्यात असलेल्या विशिष्ट प्रकारच्या उत्कटतेशी आहे. कोणत्याही तऱ्हेची तीव्रता वा उत्कटता ही मनाची अल्पकाळ टिकणारी अवस्था असते. हे एक मानसशास्त्रीय सत्य होय. साहजिकच भावकवितेचे रूप आकाराने छोटे घडविण्यात या उत्कटतेचा महत्त्वाचा सहभाग असतो.

एकूणच 'गीत, महाकाव्य, विशुद्ध कविता अशी कवितेची सगळी रूपे सामावून घेणारी कवितेची व्यापक संकल्पना असली पाहिजे अशी वाचकाच्या मनाची प्रथम धारणा होऊन बसते. पण 'हत्ती आणि आंधळे' या कथेतील डोळस माणसाची भूमिका घेऊनही अशा व्यापक संकल्पनेचा हत्ती आपल्या हाती लागत नाही. कारण कवितेची ही निरनिराळी रूपे म्हणजे कथेतल्या हत्तीचे निरनिराळे अवयव नव्हेत.'[३] तरीही हत्तीच्या निरनिराळया अवयवांची कल्पना करताना ते आंधळे काही अंशाने का होईना, हत्तीच्या मूळ स्वरूपाची कल्पना करू शकतात, तसेच कवितेची विविध रूपांची मीमांसा करताना कवितेच्या मूळ प्रवृत्तीवर आपण काही अंशाने का होइना, प्रकाश टाकू शकतो. अशा विविध अभ्यासकांच्या विविध मतप्रणालींनी कवितेचे पूर्ण रूप अभ्यासकांसमोर साकार होईल आणि कविता नक्की काय आहे, हे सामान्य वाचकही सांगू शकेल.



Scanned by CamScanner

**निष्कर्ष**

१. कलेच्या आणि वाङमयाच्या क्षेत्रात 'काव्य' ह्या आकृतीबंधाने मूलगामी चिंतन प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन असे अखंडपणे होत राहिले.

२. कविता कोणत्याही स्वरूपात असली तरी तिचे स्वरूप सारखे असते.

३. अर्थसौंदर्याने परिपूर्ण कविता रसिकांपर्यंत कधीही कोणत्याही स्वरूपात पोचू शकते.

४. आता कवी उच्चारणाचे प्रयोग करण्यापेक्षा कविता लेखनात प्रयोग करण्याचा प्रयत्न करतो आहे.

५. लहानमोठे, उलटसुलट टाइप करून, विरामचिन्हे वापरून काही कविता लिहिल्या जातात. या प्रकाराला 'कॉंक्रीट पोएट्री' म्हणूनही ओळखले जाते.

६. पद्याच्या क्षेत्रातील अनेक सर्जनशील रूपेदेखील गद्याने आपल्याकडे ओढून घेतली.

७. भावकवितेचे 'प्युअर पोएटिक एनर्जी' असे वर्णन करण्यात येते.

८. भावकवितेचे रूप आकाराने छोटे घडविण्यात या उत्कटतेचा महत्त्वाचा सहभाग असतो.

**संदर्भ**

१. धोंगडे, डॉ. रमेश, 'भाषाविज्ञान आणि शैलीचिकित्सा', समीक्षापद्धती : सिद्धांत आणि उपयोजन, संपा. डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. नंदकुमार मोरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०११, पृ. ९५

२. ठकार, निशिकांत, 'कविता स्वरूपमीमांसा', अर्वाचीन मराठी काव्यमीमांसा, डॉ. अक्षयकुमार काळे गौरवग्रंथ, संपा. डॉ.राजेंद्र नाईकवाडे आणि इतर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१४, पृ. ३१

३. तेंडुलकर, रमेश, 'साहित्यप्रकार : कविता', अर्वाचीन मराठी काव्यमीमांसा, उनि. पृ. ४४

**संदर्भग्रंथ**

१. अत्रे, प्र.के., 'ललित वाङ्मय', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती, १९४४

२. कविमंडन, भा.ज., 'कविता : स्वरूप आणि रसास्वाद', मधुराज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, १९९२

३. काळे, डॉ. अक्षयकुमार, 'मर्ढेकरांची कविता : आकलन, आस्वाद आणि चिकित्सा', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, २००६

४. जाधव, रा.ग., 'कविता आणि रसिकता', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९५

५. ठकार, निशिकांत, 'मराठी कविता : स्वरूप आणि विवेचन', स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७७



Scanned by CamScanner